अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

उजनीजवळ मोटारीच्या धडकेने वृद्ध ठार

टेंभुर्णी : वेगाने जाणाऱ्या मोटारीच्या धडकेने दुचाकीवरील ७२ वर्षीय वृद्ध इसम गंभीर जखमी होऊन मरण पावले. हा अपघात पुणे महामार्गावरील उजनी पाटी जवळ बुधवारी सकाळच्या सुमारास घडला. कृष्णात सोपानराव पाटील (वय ७२, रा. उजनी ता.माढा) असे मयताचे नाव आहे. ते आपल्या स्कुटी वरून उजनी ते टेंभुर्णीच्या दिशेने निघाले होते . त्यावेळी पुण्याहून सोलापूरच्या दिशेने जाणारी एमएच१२-पीटी-४०५१ या क्रमांकाची मोटर धडकल्याने ते गंभीर जखमी होऊन उपचारापूर्वी मयत झाले. या अपघाताची नोंद टेंभुर्णी पोलिसात झाली. पोलिसांनी मोटारीच्या चालकाविरुध्द गुन्हा दाखल केला. हवालदार तांबोळी पुढील तपास करीत आहेत.

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. २७ सप्टेंबर २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ३५८ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

तरूणाने नर्तिकेला प्रेमाच्या जाळ्यात ओढले

दहा लाख अन् बंगल्याच्या मागणीने त्याने मृत्यूलाच कवटाळले

कुर्डूवाडी–मोडनिंबमध्ये 'पिंजरा' चित्रपटाला साजेशी घटना

सोलापूर/प्रतिनिधी

'पिंजरा' चित्रपटातील 'कशी नशीबानं थट्टा आज मांडली' या गाण्याप्रमाणेची घटना कुर्डूवाडीत दत्तात्रय काशीद या तरूणाच्या बाबतीत घडली. दत्तात्रय हा मित्रांसोबत मोडनिंब येथील धनलक्ष्मी कला केंद्रात गेला होता. तेथे नर्तिकेबरोबर प्रथम नजरानजर नंतर ओळख व नंतर प्रेम आणि शारिरीक संबंध असा प्रवास झाला. नेमकी हीच गोष्ट दत्तात्रय काशीदच्या अंगलट आली. नर्तिका गरोदर राहिल्यानंतर दत्तात्रय याने तिच्या आईकडे लग्नची मागणी केली आणि इथेच गडबड झाली. नर्तिकेच्या आई व बहिणीने दत्तात्रयकडे १० लाख रूपये व बंगला बांधून देण्याची धमकी दिली. इथेच दत्तात्रय खचला. त्याने पंढरपुरातील चंद्रभागा नदीच्या पात्रात उडी मारून मृत्यूला कवटाळले आणि पिंजरा चित्रपटातील मास्तरा प्रमाणे त्याने स्वतःचे जीवन संपविले.

दत्तात्रय उर्फ पंपू राजाराम काशीद (वय ३५ रा. जुने प्रांत ऑफिस जवळ, कुर्डूवाडी) हा बजाज फायनान्स शाखा (कुर्डूवाडी) येथे मॅनेजर होता. दत्तात्रयचे सोमनाथ ढेकळे, विकास माने, राहुल कोरे हे जिवलग मित्र होते. ते चौघे कोठेही जावयाचे असल्यास मिळून जात होते. दोन वर्षांपूर्वी दत्तात्रय काशीदसह चौघे मित्र मोडनिंब येथील धनलक्ष्मी कलाकेंद्रात गेले होते. त्यावेळी दत्तात्रय याची तेथील नर्तिकेची नजरानजर झाली आणि तो तिच्यावर फिदा झाला. त्यानंतर तिन्ही मित्रांना घेऊन दत्तात्रय हा मोडनिंब येथील धनलक्ष्मी कला केंद्रात जाऊन हजेरी लावू लागला. त्यानंतर दत्तात्रय हा त्या नर्तिकेच्या प्रेमात पडला. काही दिवसानंतर दत्तात्रय हा तिन्ही मित्रांना सोडून एकटाच मोडनिंबला जावू लागला. नर्तिकेला बाहेर जेवणासाठी व फिरण्यासाठी घेवून जावू लागला. दोघांमधील प्रेमाचे रूपांतर शरीर संबधापर्यंत आले. त्यानंतर ती गरोदर राहिली. ही गोष्ट जेंव्हा नर्तिकेच्या आईला समजली. तेव्हा तिने नर्तिकेचे जबरदस्तीने ऑपरेशन केले. ही गोष्ट दत्तात्रय याला माहित नव्हती. त्यानंतर काही कालावधीनंतर ती पुन्हा गदोदर राहिली. ही गोष्ट दत्तात्रय याला समजल्यावर, त्याने तिच्या आईला भेटून लग्नाची इच्छा व्यक्त केली आणि इथूनच दत्तात्रयच्या जिवनाला वेगळी कलाटणी मिळाली. नर्तिकेच्या आई व बहिणीने दत्तात्रयला लग्न करावयाचे असेल तर १० लाख रूपये अन् बंगला बांधून देण्याची मागणी केली. मागणी मान्य न केल्यास पोलिसात फिर्याद देत बदनाम करण्याची धमकी दिली. या धमकीने दत्तात्रय मनोमन खचला आणि याबरला. आई आणि बहिणीकडून होणाऱ्या सततच्या त्रासाला कंटाळून त्याने १९ जून २०२४ रोजी पंढरपुर येथील चंद्रभागा नदीच्या पात्रात उडी मारून मृत्यूला कवटाळले. तपास स.पो.नि. भारत वाघे हे करित आहेत.

मित्राने पोलिसात तक्रार करण्याचा दिला होता सल्ला

दत्तात्रय नर्तिकेच्या बाबतीतील सर्व गोष्टी सोमनाथ ढेकळे व इतर मित्रांना सांगत होता. दत्तात्रयला मित्र सोमनाथ याने सांगितले की, पोलिस ठाण्यात त्या तिघांविरूध्द तक्रार दाखल करण्यास सांगितले होते. मात्र दत्तात्रय ऐकण्याच्या मनस्थितीत दत्तात्रय हा नव्हता, नंतर करू, पुढे करू असे तो म्हणत होता. इकडे नर्तिकेच्या आई व बहिणी कडून १० लाख आणि बंगला याचा तगादा सुरूच होता.त्यानंतर त्याने आत्महत्या केली.

शेवटी मित्रानेच दिली पोलिसात फिर्याद; तिघांवर गुन्हा

दत्तात्रय काशीद याने आत्महत्या केल्यानंतर त्याच्या अंतविधीचे सोपस्कार आटोपल्यानंतर त्याचा मित्र सोमनाथ हरि ढेकळे (वय २८ रा. जुने प्रांत ऑफिस जवळ, कुर्डूवाडी) याने २३ सप्टेंबर २०२४ रोजी पंढरपूर शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. या फिर्यादी वरून मोडलिंब येथील धनलक्ष्मी कला केंद्रातील नर्तिका, तिची आई व बहीण या तिघांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

मारहाणीतील तरुणाचा मृत्यू; चौघांवर खुनाचा गुन्हा

फायनान्सची दुचाकी ताब्यात घेताना घडला प्रकार

सोलापूर/प्रतिनिधी

फायनल कंपनीच्या ब्लॅक लिस्टमधील दुचाकी ताब्यात घेण्यासाठी गेलेल्या टीमम धील तरुणास लाथाबुक्या,खोऱ्या आणि डोक्यात फरशी घालून मारहाण करून गंभीर जखमी केले होते. त्याचा गुरूवारी शासकीय रुग्णालयात उपचार घेताना मृत्यू झाला. ही घटना सोमवारी दुपारच्या सुमारास विजापूर रोडवरील नुरानी मशिद जवळ घडली होती. लक्ष्मण नवनाथ जाधव (वय २२ रा. लिमयेवाडी,सोलापूर) असे त्या तरूणाचे नाव आहे. या संदर्भात स्पर्श फायनान्सचे तुषार कैलास गायकवाड (वय २० रा.सेंट्रलमेंट फ्री कॉलनी) यांनी विजापूर नाका पोलिसात फिर्याद दाखल केली होती. पोलिसांनी अविनाश मदनावाले, राजेश मदनावाले,विशाल जाधव आणि अक्षय कांबळे (सर्व रा.कुमठा नाका) या चौघांविरुध्द गुन्हा दाखल केला. स्पर्श फायनान्स कंपनीच्या ब्लॅक लिस्ट मधील बजाज पल्सर ही दुचाकी ताब्यात घेण्यासाठी कंपनीचे तुषार गायकवाड, त्यांचा मित्र लक्ष्मण जाधव आणि टीम लीडरसह ५ जण सोमवारी दुपारी विजापूर रोडवरील नुरानी मशीद जवळ गेले होते. दुचाकी ताब्यात घेण्याच्या कारणावरून अविनाश मदनावाले याच्यासह चौघांनी त्यांना शिवीगाळ करीत मारहाण केली. तर एकाने लक्ष्मण जाधव याच्या डोक्यात फरशी घातली होती. त्यात तो गंभीर जखमी झाला होता. त्याचा उपचारादरम्यान गुरुवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास मृत्यू झाला. या प्रकरणात अटकेत असलेल्या चौघा आरोपींना पोलीस कोठडी देण्यात आली. तपास सहाय्यक फौजदार गायकवाड करीत आहेत.

पाठीमागून ट्रक धडकल्याने वृद्ध ठार

नातेपुते : वेगाने जाणाऱ्या कंटेनरच्या धडकेने दुचाकीच्या पाठीमागील ६५ वर्षीय वृद्ध गंभीर जखमी होऊन मरण पावले. हा अपघात नातेपुते ते पंढरपूर रोडवरील मांडवी (ता.माळशिरस) येथे बुधवारी दुपारच्या सुमारास घडला. ज्ञानेश्वर बजरंग नवले (वय ६५ रा.कम लापूर ता.सांगोला) असे मयताचे नाव आहे. तेआपले मेहुणे सचिन एकनाथ रसाळ यांच्या दुचाकी पाठीमागे बसून पालखी महामार्गावरून जात होते. मांडवे येथील राजशेखर यांच्या किराणा दुकानाजवळ पाठीमागून टीव्ही १०-जीडब्ल्यू-८३४९ या क्रमांकाचा कंटेनर धडकल्याने ज्ञानेश्वर नवले हे गंभीर जखमी होऊन उपचारापूर्वी मयत झाले. या अपघाताची फिर्याद मयताची मुलगी कविता राक्षे (रा.आटपाडी जि.सांगली) यांनी नातेपुते पोलिसात दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी पसार झालेल्या कंटेनर चालकाविरुध्द गुन्हा दाखल केला. फौजदार दिये पुढील तपास करीत आहेत.

शिक्षकाकडून मारहाण

सोलापूर : शिक्षकाने हाताने मारहाण करून ढकलून दिल्याने नववीतील १५ वर्षाचा विद्यार्थी जखमी झाला. ही घटना सेंट जोसेफ प्रशालेत गुरुवारी सकाळच्या सुमारास घडली. आहद फहद खान (वय १५, रा.रेल्वे लाईन,हाजी हजरतखान चाळ) असे जखमी झालेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे. त्याला अस्लम कुडले यांनी दुपारी शासकीय रुग्णालयात दाखल केले. आहद खान हा नववीत आहे. सकाळी त्याला शिक्षकाने मारहाण करत ढकलून दिले. त्याच्या हाताला जखम आणि कंबरेला मुकामार लागून जखमी झाला. अशी नोंद सदर बजार पोलिसात झाली आहे.

पश्चिम महाराष्ट्रात ४१६ कोटींच्या वीजबिलांची थकबाकी

जिल्ह्यातील ग्राहकांकडे ६० कोटी थकीत

सोलापूर/प्रतिनिधी

विजेचा वापर केल्यानंतरही बिलांचा मासिक भरणा नियमित होत नसल्याने पश्चिम महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक वर्गवारीतील १९ लाख १९ हजार २३१ ग्राहकांकडे ४१६ कोटी ८२ लाख रुपयांची थकबाकी झाली आहे. थकबाकीदार वीजग्राहकांनी थकीत बिलांचा त्वरित भरणा करावा व वीजपुरवठा खंडित करण्याची कटू कारवाई टाळावी असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

वीजग्राहकांना चालू व थकीत वीजबिलांचा भरणा करणे सोयीचे व्हावे यासाठी पुणे, सातारा, सोलापूर, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील महावितरणचे सर्व अधिकृत वीजबिल भरणा केंद्र शनिवारी (दि. २८) व रविवारी (दि. २९) कार्यालयीन वेळेत सुरू राहणार आहेत. सोलापूर जिल्ह्यात २ लाख ९२ हजार ६७० ग्राहकांकडे ६० कोटी ६३ लाख, सांगली- २ लाख २६ हजार ३८३ ग्राहकांकडे ३२ कोटी ५८ लाख थकबाकी आहे. या थकीत बिलांचा त्वरित भरणा करावा व वीजपुरवठा खंडित करण्याची कटू कारवाई टाळावी असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

सोलापूर जिल्ह्यातील तीन लाख वीज ग्राहकाकडे ६० कोटींची बिले थकीत आहेत. महावितरणची आर्थिक स्थिती वीजबिलांच्या वाढत्या थकबाकीमुळे गंभीर होत आहे. वीजबिल वसुलीवरच महावितरणचा आर्थिक अवलंबून असल्याने वीज ग्राहकांनी चालू व थकीत वीजबिलांचा त्वरित भरणा करावा.

–रमेश राठोड, अभियंता सोलापूर विभाग

जावयास मारहाण; तोंडात विष ओतले

सोलापूर : पत्नी प्रसुत झाल्याने तिला भेटण्यासाठी सासरी आलेल्या जावयास मारहाण करून त्याच्या तोंडात बळजबरीने विषारी द्रव ओतण्यात आले. ही घटना शहरातील सेटलमेंट फ्रि कॉलनी परिसरातील अंबाबाई मंदिराजवळ बुधवारी सायंकाळच्या सुमारास घडली . किरण अरुण पवार (वय २४ रा.राळेरास, ता.बार्शी) असे जखमीचे नाव आहे. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. पत्नीची डिलेव्हरी झाल्याने तो बुधवारी बार्शी येथून पत्नीला भेटण्यासाठी सासरी आला होता. त्यावेळी मागील भांडणावरून मायकल चव्हाण, वैशाली चव्हाण आणि इतर दोघांनी मिळून त्याला लाथाबुक्क्याने मारहाण करत त्याच्या तोंडात बळजबरीने कीटकनाशक पाजले. अशी नोंद सलगर वस्ती पोलिसात झाली आहे.

घरात चक्कर येऊन पडलेल्या इसमाचा मृत्यू

सोलापूर : एमआयडीसी परिसरातील नितीन नगर येथील भाड्याच्या घरात चक्कर येऊन पडून जखमी झालेले जावेद शुकुर शेख (वय ४४ रा.संगमेश्वरनगर अक्कलकोट रोड) हे उपचारादरम्यान बुधवारी रात्री मयत झाले. शनिवारी पहाटेच्या सुमारास ते नितीन नगर येथील घरात चक्कर येऊन कोसळले होते. डोक्यास जखम झाल्याने नाजनीन (पत्नी) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. अशी नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

घाबरू नका, कार्यक्रमाची पत्रिका आहे ही!!!

कल्याण
179-70-235

मुंबई
369-82-138

आक्षेपार्ह देखावे नको, सूचनांचे पालन करा; अन्यथा कारवाई

शांतता कमिटीच्या बैठकीत पोलीस आयुक्तांचा इशारा

सोलापूर/प्रतिनिधी

नवरात्र मिरवणूक धार्मिक स्थळांजवळ व संवेदनशील ठिकाणी जास्त वेळ रेंगाळत ठेवू नये, आक्षेपार्ह देखावे करू नये, सोशल मिडीयावर अफवा पसरवू नका, शासनाच्या सूचनांचा पालन करा, कायदा हातात घेऊ नका अन्यथा कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलिस आयुक्त एम. राजकुमार दिला.

नवरात्र महोत्सवा निमित्त पोलिस आयुक्तालयात शांतता कमिटी, नवरात्र महोत्सवाचे पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित केली होती, त्यावेळी पोलिस आयुक्त बोलत होते. ३ ते दि. १२ ऑक्टोबर या कालावधीत नवरात्रोत्सव साजरा करण्यात येत आहे. यावेळी पोलिस आयुक्त राजकमार यांनी, नवरात्रोत्सवात जबरदस्तीने वर्गणी मागू नये. जे स्वेछेने वर्गणी देतात. तेवढीच वर्गणी घ्यावी, सर्व मंडळांनी आपल्या मंडळांची धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी करावी. उत्सव काळात सर्व मंडळांनी सीसीटिव्ही कॅमेराची सोय करावी, देखावे चित्र आक्षेपार्ह नसावेत, उत्सवाचे पावित्र्य राखावे. देखावे, रोषणाई पाहण्यास येणाऱ्या महिला व पुरूष भाविकांकरिता स्वतंत्र रांगेची सोय करावी. प्रवेशाकरिता आणि बाहेर जाण्यासाठी स्वतंत्र गेट असावे, ध्वनीप्रदुषणच्या अनुषंगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे., मंडळांनी महावितरण विभागाकडून अधिकृत विद्युत जोडणी करून घ्यावी, मिरवणूक संवेदनशील ठिकाणी जास्त वेळ रेंगाळत ठेवू नये,मूर्तीची देखभाल करतील याची पुरेपूर काळजी घ्यावी आदी सूचना दिल्या.

यानंतर दिलीप कोल्हे, ॲड. प्रशांत कांबळे, प्रशांत अवस्थी, सुमन जाधव, शोभना सागर, युवराज पवार आदींनी मते मांडली. महापालिकेविरूध्द तक्रारी जास्त मांडण्यात आल्या. या बैठकीस पोलिस उपायुक्त विजय कबाडे, अजित बो-हाडे, डॉ. दिपाली काळे, सहाय्यक पोलिस आयुक्त प्रताप पोमण, राजन माने, सुधीर खिरडकर व अधिकारी उपस्थित होते.

सोलापूर: शांतता कमिटीच्या बैठकीत मार्गदर्शन करताना पोलिस आयुक्त एम. राजकमार. व्यासपिठावर उपायुक्त विजय कबाडे, अजित बो-हाडे, डॉ. दिपाली काळे व इतर अधिकारी.

...तर त्वरित पोलीस यंत्रणेस माहिती द्या

सोशल मिडीयावरून काही आक्षेपार्ह मेसेजेस, फोटो, पोस्ट व्हायरल होत असल्याचे निर्दशनास आल्यास त्याबाबत त्वरित पोलिस यंत्रणेस कळवावे. शांतता कमिटी सदस्य व नागरीकांनी आपल्या परिसरात चाललेल्या बेकायदेशी बाबींची माहिती पोलिसांना द्यावी. मिरवणुकीमध्ये अफवा पसरवू नये. मंडळांनी ऑनलाईन, ऑफलाईन पध्दतीने परवानगी घेणे बंधनकारक आहे. याठी प्रत्येक पोलिस ठाण्यात स्वतंत्र व्यवस्था करण्यात आल्याचेही पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांनी सांगितले.

कॅन्टीन चालकावर चाकूने खुनी हल्ला

- चौघा मारेकऱ्यांना जागेवर पकडले
- सिंहगड कॉलेजमधील घटना

सोलापूर : सोलापूर-पुणे रोडवरील कोंडीजवळील सिंहगड इन्स्टिट्यूट मध्ये गुरूवारी सायंकाळी पाचच्या सुमारास कॅन्टीन बंद कर म्हणत चालक प्रकाश माळी याच्या पोटात चाकुने वार करून खुनीहल्ला करण्यात आला. घटनेचे वृत्त समजताच फौजदार चावडी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक विकास देशमुख व त्यांचे पथक घटनास्थळी गेले. त्यांनी खुनीहल्ला करणाऱ्या संजय उफाडे व त्याचे तीन साथीदार या चौघांना जागेरच पकडले.

सिंहगड कॉलेजमध्ये संजय उफाडे व त्याचे ७ साथीदार २६ सप्टेंबर रोजी सांयकाळी गेले होते. त्यावेळी कॅन्टीन सुरूच होते. त्यावेळी संजय उफाडे याने कॅन्टिन चालक प्रकाश माळी यांना कॅन्टीन बंद कर असे सांगितले. यावेळी दोघांमध्ये वादावादी झाली. यावेळी संजय उफाडे व त्याच्या साथीदारांनी कॅन्टीन चालक प्रकाशच्या पोटात चाकूने वार केले. यावेळी कर्मचारी हे भांडण सोडविण्यासाठी गेल्यावर संजय उफाडे व त्याच्या साथीदारांनी त्यांनाही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. फौजदार चावडी पोलिस ठाण्याचे पो.नि.विकास देशमुख, स.पो.नि. अजित पाटील व त्यांचे पथक लागलीच घटनास्थळी पोहोचले. यावेळी पोलिसांनी मारेकऱ्यांचा पाठलाग चौघांना ताब्यात येतले आहे. या प्रकरणी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.